शब्द–ब्रह्म
E ISSN 2320 – 0871
भारतीय भाषाओं की अंतर्राष्ट्रीय मासिक शोध पत्रिका
17 अक्टूबर 2021
पीअर रीव्यूड रेफ्रीड रिसर्च जर्नल

# नाटककार भास : प्रयोगात्मक नवनिर्मितीची जनक

प्रा.राहु ल राम हळदे (शोधार्थी)
स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड़
प्रा.डॉ.संजय पाटील देवाळाणकर (मार्गदर्शक)
के.एस.के.महाविद्यालय,
बीड़, महाराष्ट्र, भारत

## शोध संक्षेप

*प्राचीन नाटककारांमध्ये भास हे श्रेष्ठ नाटककार मानले जातात, त्यांच्या प्रतिभेचे गोडवे कालिदास, भवभूती, सारख्या अनेक विद्वानांनी गायलेले आपणास आढळतात। सन 1913 मध्ये त्यांची तेरा नाटके भास नाट्यचक्र म्हणून प्रसिद्ध करण्यात आले होती। त्यामुळे आजचे आधुनिक रंगकर्मी व दिग्दर्शक सुद्धा त्यांचा नाटका पासून प्रभावित झालेले आढळतात। भासांचा कालखंड हा इसवी सन पूर्व 300 ते 400 च्या दरम्यान असल्याचे समजतेए या संदर्भात काही पुरावे देण्यासारखे आहेतण् तरीही त्यात तर्कवितर्क असू शकतात यात वाद नाही। नाटककार भास हे प्रसिद्ध होण्यामागे त्यांची विद्रोही वृत्ती व रंगमंचावरील प्रयोगात्मक मूल्य हे आहे। हे मूल्य त्यांच्या बहु विषयावर लिहिलेल्या नाटकातून समोर येताना दिसतात। भासांनी आपल्या प्रतिभेने काही संकल्पना प्रथमताच रंगमंचावर मांडल्या जसे कीए विषय वस्तूंची विविधता, विभागीय रंगमंच याचा उपयोग, नाटकाची मालिका, शोकांतिका निर्मिती, बोधयुक्त वाक्य रचना, सरळ व छोटे संवाद, आणि दृश्य प्रभावक्ता, पात्रांचे शुद्धीकरण, वस्तूंचे मानवीयकरण अशा विविध घटनांमुळे भास हे एक प्रयोगात्मक नवनिर्मितीची जनक म्हणून पुढे येताना दिसतात।*

## प्रस्तावना

नाटककार भास भारतीय रंगभूमीवरचे आद्य नाटककार आहेत। ज्यांनी विद्रोही भूमिका घेत रंगभूमीवर अनेक यशस्वी प्रयोग केले। त्यांच्या एकूण नाटकां पैकी फक्त 13 नाटके आज उपलब्ध आहेत, जी टी गणपती शास्त्री यांनी 1913 मध्ये त्रिवेंद्रम येथे शोधून काढली व 'त्रिवेंद्रम प्लेज' म्हणून प्रकाशित केली गेली। त्यालाच 'भासनाट्यचक्र' नावाने प्रसिद्ध करण्यात आले आहे। नाटककार भासांच्या कालखंड या विषयी अनेक तर्क-वितर्क काढले जातात, तरी सुद्धा त्यांच्या साहित्याच्या आधारावर व आंतरिक-बाह्य परीक्षण निरीक्षणाच्या आधारावर, त्यांचा कालखंड हा इसवी सन पूर्व 300 ते 400 च्या दरम्यान ठरवता येतो। नाटककार भासांच्या नाटकाची ख्याती ही सर्व दूर होती। म्हणूनच कालिदास, भवभूती, राजशेखर, बाणभट्ट सारखे साहित्यकार त्यांच्या साहित्याचे गोडवे गाताना दिसतात, त्यांना आदरस्थानी मानतात। या शिवाय भवभूती, शूद्रक, श्रीहर्ष सारखे नाटककार यांच्या कडून प्रेरणा घेताना दिसतात। तसेच आधुनिक युगातील प्रतिभावंत दिग्दर्शक आजही भासांच्या नाटकाचे यशस्वी मंचन करून त्यातून नवीन संकल्पना प्रवाहित करताना आढळतात। त्या मध्ये कावालाम नारायण पान्निक्कर, रतन थियाम, बन्सीकौल, हबीब तनवीर, वामन केंद्रे या सारखे महान निर्देशक या मध्ये सम्मिलित

शब्द–ब्रह्म
E ISSN 2320 – 0871
भारतीय भाषाओं की अंतर्राष्ट्रीय मासिक शोध पत्रिका
17 अक्टूबर 2021
पीअर रीव्यूड रेफ़्रीड रिसर्च जर्नल

आहेत। म्हणूनच भासांचे त्याकाळातील प्रयोगात्मक मूल्य अभ्यासणे गरजेचे ठरते।

### भासांची नाट्यसंपदा व त्यावरील विश्लेषण

भासांनी वेगवेगळ्या विषयावर आणि वेगळ्या कथावस्तूची निवड करून अतिशय दर्जेदार नाट्य निर्मिती केलेली आढळते। त्यांनी रामायण, महाभारत, काल्पनिक कथा, लोककथा, अशा बहु अंगी कथावस्तू मधून आपली प्रतिभालोकाभिमुख केलेली आहे।

1 रामायणावर आधारित नाटके : प्रतिमा, अभिषेक

2 महाभारतावर आधारित नाटके : दूतवाक्य, दूत घटोत्कच, मध्यम व्यायोग, कर्णभार, उरूभंग, पंचरात्र

3 उदयन कथेवर आधारित नाटके : प्रतिज्ञा योगंधारायण, स्वप्नवासवदत्ता

4 लोक कथेवर आधारित नाटके : चारुदत्त, अविमारक

5 कृष्ण कथेवर आधारित नाटके : बालचरित्र

भासांनी कथा वैविध्य सोबतच मूळ कथानकात अमुलाग्र बदल केलेले आपणास आढळतात। जसे की प्रतिमा नाटकात वल्कल दृश्य आणि प्रतिमा गृहाचे दृश्य टाकून नाटकाच्या प्रभावाला अधिक बळकटी दिली। याशिवाय महाभारता मध्ये सत्ता अधिकारा साठी युद्ध झाले ते कारणच बदलून पंचरात्र नाटकात पांडव व कौरव यांच्या मध्ये समेट घडवून आणला व महाभारताच्या कथानकाला एक वेगळेच वळण दिले।

याशिवाय दूत घटोत्कच नाटकात घटोत्कच यांचे कडून दूत म्हणून कौरवाकडे पाठविले। अशा नव्या संकल्पना भासांनी प्रथमच रंगभूमीवर मांडल्या तसेच मध्यम व्यायोग नाटकातून हिडिंबा व भीमसेन यांच्यातील पुनर्मीलन दाखविले, उरुभंग हे नाटक भासांच्या प्रतिभेची साक्ष देणारी एक प्रभावी शोकांतिका आहे। ज्यामुळे रंगभूमीवर नव्याने प्रयोगात्मक मूल्य रुजायला लागले।

भासांचे उदयन कथेवर आधारित प्रतिज्ञा योगंधारायण नाटक हे मंत्री योगंधारायण यांची प्रामाणिकता व उदयन-वासवदत्ता यांचेवरील प्रेमाची कथा आहेण् व त्यांच्याच उत्तररंग म्हणून भासांनी स्वप्नवासवदत्ता हे नाटक लिहिले। ज्यामुळे ते नाट्य व साहित्य जगतात ख्यातनाम झाले। स्वप्नवासवदत्ता नाटकातील कथाए पात्र संवादरचना नाट्यबांधणी दृश्य बांधणी ही इतकी सुव्यवस्थित आहे की भारतातील प्राचीन साहित्यकारा मध्ये हे नाटक अत्यंत नावलौकिक प्राप्त झालेले नाटक आहे। असा स्पष्ट उल्लेख आपणास आजही मिळतो। चारुदत्त व अविमारक नाटकातील प्रेम, विरह, संघर्षए राजकारण यामुळे हे नाटक अत्यंत प्रभावी नाटक म्हणून समोर येताना दिसते। तसेच बालचरित्र नाटक हे विष्णू भक्तीचे उदाहरण म्हणून भासाने रंगवलेले आहे।

### भासांच्या नाटकातील प्रयोगात्मक मूल्य

भास हा विद्रोही नाटककार म्हणून प्रसिद्ध आहे। त्यांनी भरत नाट्यशास्त्राचे नियम झुगारून स्वतहाची अशी नवीन रंगभाषा निर्माण केली। नांदी नंतर लगेच सूत्रधाराचा प्रवेश करून घेतला। त्यामुळे पूर्व रंगामध्ये बदल झाला व नाटकाचा प्रारंभाला परंपरागत विधीपासून थोडा बदल मिळालाण् त्याशिवाय प्रतिमा ह्या नाटकात दशरथाचा मृत्यू दाखला, त्याच प्रमाणे उरुभंग नाटकात रंगमंचावर दुर्योधनाचा मृत्यू दाखविला, तसेच स्वप्नवासवदत्ता नाटकात निद्रेची दृश्य दाखविलीए त्यामुळे भासांनी भरत नाट्यशास्त्राचे नियम झुगारून नाटकाची रंजकता वाढविण्यासाठी अनेक प्रयोगात्मक बदल आपल्या रंगकर्मात केलेले आहेत। भासांनी रंगभूमीवर अनेक

नवनवीन प्रयोगाच्या घाट घालून दिलेला आढळतो। यामुळे भासांची प्रतिभा व त्यांच्या प्रयोगात्मक मूल्य याविषयी सहज आकलन होण्यास मदत मिळते।

**विभागीय रंगमंचाचा उपयोग**

स्वप्नवासवदत्ता या नाटकात भासांनी एकाच उपवनाच्या दृश्यात दोन दृश्य एकाच वेळी रंगमंचावर सादर केलेली आढळते, त्यावेळी ही रचना अभिनव होती असे दिसते।

**नाटकाची मालिका निर्मिती**

अभिषेक हे नाटक प्रतिमा नाटकाचा उत्तरार्ध वाटतो। त्याशिवाय प्रतिज्ञा योगान्धारायण नाटकाचा उत्तरार्ध हा स्वप्नवासवदत्ता हे नाटक असल्याचे प्रकर्षाने जाणवते त्यामुळे ही आजच्या मालिका स्वरूपाची संकल्पना भासानी त्या काळातच रुजवलेली होती असे दिसते।

**भारतीय शोकांतिकेचे जनक भास**

शोकांतिकेचा संकल्पना ग्रीक रंगभूमीवर जरी रुजल्या किंवा नावारूपास आलेल्या असल्या, तरी त्याच्याच धर्तीवर, त्याच कालखंडात, भास सारख्या प्रतिभासंपन्न नाटककाराने उरुभंग नावाच्या शोकांतिकेची निर्मिती केली। अशी अभिनव संकल्पना निर्माण करणारा हा प्रथमच भारतीय नाटककार त्या काळात होऊन गेला आहेण्

**सरळ सोपे व संक्षिप्त संवाद**

भासानी साहित्य विशेषता वाढवण्यासाठी कुठेही कालिदासा सारखेअति-अलंकारित असलेले वाक्य, समासाचा अति वापर असलेले वाक्य, न-लिहिता रंगभूमीवर प्रस्तुतीकरणावर आधारित तसेच रंगतंत्राचा इतंभूत वापर करून, भासाने आपली नाटके लिहिलीत, त्यामुळे ती अर्थपूर्ण रसपूर्ण आणि गूढार्थ घेऊन अधिक प्रभावी वाटायला लागली। त्यामुळे खऱ्या अर्थाने अभिनय व्यवस्थित बाहेर पडायला मदत झाली। म्हणूनच रंगतंत्राचा आधार घेत भासांची वाक्य रचना ही सरळ सोपी व प्रभावी ठरली यात वाद नाही।

**पात्रांचे शुद्धीकरण**

रामायणात निगेटिव पात्र असणारी कैकयी ही सर्व मनात तिरस्कृत आहे। तसेच महाभारतातील दुर्योधन हा खलनायक म्हणून सर्व जनमानसात रुजलेला आहे। प्रत्येक मनुष्यात कुठे ना कुठे चांगुलपणा असतोच, ही भावना पहिल्यांदाच भासाने पात्रात रुजवली व त्यांचे शुद्धीकरण प्रतिमा, अभिषेक तसेच पंचरात्र, उरुभंग या नाटकातून करून जगासमोर प्रसिद्ध केले। त्यामुळे कैकयी व दुर्योधन या पात्रा विषयी सहजच सहानुभूती माणसाच्या मनात निर्माण होण्यास मदत होते।

**वस्तूंचे मानवीकरण**

रंगमंचावरील वस्तूंना पात्राचे स्वरूप देऊन नाटकाचे दृश्यात्मक मूल्य वाढविण्याचे काम भासाने आपल्या बालचरित्र नाटकातकेलेले दिसतेण् कृष्णाचे आयुधे मानवी स्वरुपात दाखवून नाटकाचा प्रभाव भासाने तीव्र केलेला आहेण् ही त्या काळातली अभिनव संकल्पना होतीए त्यामुळेच भास हा प्रतिभेचा धनी आहे, असे म्हणण्यास हरकत नाही।

**रूपकाची बहुआयामी उपयोगिता**

भारतीय दशरूपक यापैकी भासाचे नाटक कोणत्याही एका रूपकात अडकलेले नाही किंवा त्यांची सर्व नाटके एकाच रूपकातील नसून त्यांनी नाटक हे व्यायोग, उत्सुस्टीकांक, समावकार अशा वेगवेगळ्या रूपकात नाटकाला विभाजित करून कथानकाप्रमाणेच रूपकाची एक-सुरता भासाने तोडली, व नाटकाला बहुआयामी पद्धतीने प्रस्तुत केले।

**पात्रांची नवीन माडणी**

शब्द–ब्रह्म
E ISSN 2320 – 0871
भारतीय भाषाओं की अंतर्राष्ट्रीय मासिक शोध पत्रिका
17 अक्टूबर 2021
पीअर रीव्यूड रेफ्रीड रिसर्च जर्नल

दारिद्री ब्राह्मण चारुदत्त याला चारुदत्त नाटकात नायक म्हणून समोर आणले व राक्षस योनीतील हिडींबा व घटोत्कच याला नायकत्व देण्याची संकल्पना ही त्या काळात अतिशय अफलातून होती। उदयन-वासवदत्ता ह्यांना प्रतिज्ञा-योगान्धारायण नाटकात प्रत्यक्ष रंगमंचावर न आणता त्यांना नाटकाचा नायक केले। त्यामुळे पारंपरिक किंवा साचेबद्ध नाटकातील नायक नव्याने व्याख्याईत झाला व भासाने तो ट्रेंड बदलला असे म्हणण्यास हरकत नाही।

**दिग्दर्शकीय कौशल्य**

भासांची रंगतंत्राची पकड अफलातून असल्यामुळे ते नाट्य लेखका व्यतिरिक्त, एक उत्कृष्ट दिग्दर्शक असल्याचे जाणवते, रंगमंचावर कोणते पात्रकोणत्या स्वभावाने, कोणत्या वेशभूषेत प्रवेश करावे याचे विस्तृत वर्णन भासांच्या प्रत्येक नाटकातकमी जास्त प्रमाणात संकेतात्मक स्वरुपात मिळते। पात्रांच्या आंतरिक व बाह्य-संघर्ष, पात्रांच्या रंगमंचावरील कार्य व्यापार, नाटकाची सटीक व सुबक दृश्य बांधणी, नाटकाला पोषक अशी नव्या काल्पनिक घटनांची दृश्य रचनाए संगीताचा उपयोग, अभिनय सिद्धांताचा प्रभावी वापर, यामुळे त्यांच्यातील दिग्दर्शकीय कौशल्य हे प्रेक्षकांना प्रभावित केल्याशिवाय राहत नाही।

**रसनिर्मिती ची प्रभाविकता**

भासानी तेराही नाटकात संक्षिप्त व रसपूर्ण संवाद रचना केल्यामुळे त्यांच्या नाटकातील प्रत्येक वाक्यातून रसनिर्मिती अतिशय प्रभावीपणे होताना। दिसतेयाशिवाय त्यांची नाटके बाकी रचनाकार यासारखी फक्त शृंगार रसावर भर देणारी नसून, ती विरह, करूण, हास्य, रौद्र, भयानक अशा चौफेर रसांवर अवलंबून असल्यामुळे नाटकाचा एक वेगळाच प्रभाव प्रेक्षकांवर होतो अशा वेगवेगळ्या प्रयोगात्मक मूल्यांमुळे भास हे आगळेवेगळे तसेच प्रतिभासंपन्न रंगकर्मी म्हणून पुढे येताना दिसतातण् त्यामुळे त्यांची ख्याती ही देशभर आहे।

**निष्कर्ष**

वरील सर्व विश्लेषनावरून मी खाली निष्कर्षापर्यंत पोहोचत आहे की :

भासांची नाट्यतत्वावर आणि रंगतत्वावर उत्कृष्ट पकड होती। त्यामुळे त्यांची नाटके अनेक रंगकर्मींना आंदोलित करू शकली।

भासांनी काही नवीन संकल्पना प्रथमच रंगभूमीवर मांडल्या जसे की, विभागीय रंगमंच त्याचा उपयोग, पात्रांचे शुद्धीकरण, नाटकाची मालिका, ज्यामुळे रंगकर्मीचे स्वरूप हे नव्या दिशेने प्रभावित झालेले आढळते।

भास हे अनेक रंगकर्मींना अप्रत्यक्षरित्या मार्गदर्शन करताना दिसतात। त्यामुळे त्यांच्यातील विद्रोही व प्रतिभासंपन्न व्यक्तित्व प्रभावीपणे बाहेर येण्यास मदत मिळते। तसेच त्यामुळे नवीन रंगकर्मी त्यांची नवनिर्मिती ची संकल्पना घेवून रंगभूमीवर नवीन संकल्पना राबविण्यास प्रोत्साहित होऊ शकतात।

## संदर्भ ग्रंथ

*1 भरत मुनीचे नाट्यशास्त्र, गोदावरी केतकर, पापुलर प्रकाशन मुंबई 1955*

*2 नाट्यशास्त्र कि भारतीय परंपरा और दशरूपक, हजारी प्रसाद द्विवेदी, राजकमल प्रकाशन दिल्ली 2007*

*3 भास के नाटक भाग 1, 2, 3 चंद्रशेखर उपध्याय, नाग पब्लिकेशन दिल्ली*

*4 भास का रंगमंच, संगीता गुंन्देंचा न्यू भारतीय बुक कारपोरशन दिल्ली*